जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph**.020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ५४६ दिनांक -१५/०७/२०२३**

## दरोडा व वाहनचोरी विरोधी पथक १, गुन्हे शाखा, पुणे शहर
## घरफोडी चोरी करणा-या महिलेस केले जेरबंद

दिनांक ११/०७/२०२३ रोजी फिर्यादी ह्या त्यांचे मुलास शाळेत सोडणेसाठी घराचे कुलुप लावुन चावी कुलुपालाच विसरुन गेलेने घरी परत आलेवर घरातील कपाटात पाहिले असता फिर्यादी यांनी कपाटात ठेवलेल्या सोन्याचे दागिन्यां मधील अंगठीच्या डबीचे झाकण उघडलेल्या स्थितीत आढळुन आले. शंका आल्याने त्यांनी कपाटातील तिजोरी चेक केली असता तिजोरीतील सोन्याचे दागिने व पर्समधील काही दागिने व रोख ४०,०००/- रुपये असा एकुण २,८७,०००/- हजार रुपयांचा ऐवज चोरी झाल्याने त्याबाबत त्यांनी कोथरुड पोलीस स्टेशन येथे **गुन्हा रजि नं १६२/२०२३,भादंवि कलम ४५४,३८०** अन्वये तक्रार दिलेवरुन गुन्हा दाखल करण्यात आला होता.

दाखल गुन्ह्याचा इकडील पोलीस अधिकारी व अंमलदार यांचेकरवी समांतर तपास चालु असताना स्टापने सी.सी.टि.व्ही. फुटेज वरुन एका महिलेच्या संशयास्पद हालचाली पाहुन त्या महिलेचा तपास केला असता स्टाफमधील पोलीस अंमलदार धनंजय ताजणे यांना त्यांचे गोपनिय बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, वर नमुद गुन्ह्यातील महिला ही बेनकर वस्ती, धायरी, पुणे या परिसरात असल्याची खात्रीशीर माहिती मिळाल्यानंतर नमुद महिलेचा वरील परिसरात शोध घेतला असता ती मिळुन आल्याने तिस ताब्यात घेवुन तिचेकडे अधिक चौकशी करता तिने फिर्यादी यांचे घराचे कुलुपाला चावी असल्याचे पाहुन कुलुपाला असलेल्या चावीनेच कुलुप उघडुन दरवाजावाटे आत प्रवेश करुन सदरची घरफोडी चोरी केल्याचे कबुल केल्याने नमुद महिलेकडुन चोरीस गेलेले **एकुण ४९.५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम असा एकुण २,५५,२९०/- रु.कि.चा** मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन सदर महिलेस पुढील कारवाई करीता कोथरुड पोलीस स्टेशन,पुणे शहर यांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास कोथरुड पोलीस स्टेशन, पुणे शहर हे करीत आहेत.

सदरची कारवाई मा.पोलीस आयुक्त पुणे शहर श्री.रितेश कुमार,मा.पोलीस सह आयुक्त,श्री.संदीप कर्णिक,मा.अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री.रामनाथ पोकळे,मा.पोलीस उप आयुक्त,(गुन्हे)श्री.अमोल झेंडे, मा.सहा.पोलीस आयुक्त गुन्हे-१ पुणे शहर श्री.सुनिल तांबे, यांचे मार्गदर्शनाखाली दरोडा व वाहनचोरी विरोधी पथक-१,गुन्हे शाखा,चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.अशोक इंदलकर,सहा.पोलीस निरीक्षक नरेंद्र पाटील, पोलीस उप निरीक्षक शाहिद शेख,पोलीस अंमलदार धनंजय ताजणे, प्रदीप राठोड, गणेश ढगे, मॅगी जाधव, आजिनाथ येडे, शिवाजी सातपुते म.पोलीस अंमलदार हेमा ढेबे, दरोडा व वाहनचोरी विरोधी पथक-१, गुन्हे शाखा, पुणे शहर यांनी केली आहे.